# SIEMENS

## Notice of 58th Annual General Meeting, Book Closure Dates and Remote E-Voting information

Notice is hereby given that the 58th Annual General Meeting ("AGM") of Siemens Limited (the "Company") will be held on **Friday, 29th January, 2016 at 3.00 p.m.** at Yashwantrao Chavan Pratishthan Auditorium, Y. B. Chavan Centre, General Jagannathrao Bhonsle Marg, Nariman Point, Mumbai 400021, to transact the business as set forth in the Notice dated 27th November, 2015 convening the AGM.

The electronic copy of the Annual Report 2015 containing, inter-alia, the Notice of AGM has been sent to all the Members whose e-mail IDs are registered with the Company or Depository Participant(s) and physical copy has been sent to all other Members at their registered address by the permitted mode.

In terms of Section 108 of the Companies Act, 2013 ("the Act") read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 as amended by the Companies (Management and Administration) Amendment Rules, 2015 ("the Rules") and Regulation 44 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations"), the Company is providing to its Members with the facility to cast their vote electronically through the remote e-voting services provided by National Securities Depository Limited ("NSDL") and also to cast vote through a ballot form where Members do not have access to remote e-voting facility, on all the resolutions set forth in the Notice of 58th AGM and the business may be transacted through such voting. The details pursuant to the provisions of the Act and the Rules are given hereunder:

1. On 28th December, 2015, the Company has completed the dispatch of the Annual Report together with Notice of AGM either by e-mail or physical copy to the Members whose names appeared in the Register of Members / Record of Depositories as on 11th December, 2015.
2. The remote e-voting period will commence on **Tuesday, 26th January, 2016 (9.00 a.m. IST)** and will end on **Thursday, 28th January, 2016 (5.00 p.m. IST)**. The remote e-voting module shall be disabled by NSDL for voting after **5.00 p.m. IST** on **Thursday, 28th January, 2016** and remote e-voting shall not be allowed beyond the said time.
3. Any person, who acquires shares of the Company and become Member of the Company after dispatch of the Notice of AGM and holding shares as of the cut-off date i.e. **Friday 22nd January, 2016**, may obtain the login ID and password by sending a request at evoting@nsdl.co.in.

   However, if a Member has already registered with NSDL for remote e-voting then the Member can use their existing user ID and password for casting their vote. If a Member has forgot the password, Member can reset their password by using "Forgot User Details/Password" option available on www.evoting.nsdl.com or contact NSDL at the following toll free no.: 1800-222-990.

   A person whose name is recorded in the register of members or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off date only shall be entitled to avail the facility of remote e-voting, by ballot paper as well as voting at the AGM.
4. Voting at AGM: The Members who have not casted their vote either through remote e-voting or through Ballot Form, can exercise their voting rights at the AGM. The Company will make necessary arrangements in this regard at the AGM Venue.
5. Members may participate in the AGM even after exercising their right to vote through remote e-voting or through Ballot Form but shall not be entitled to vote again.
6. Members who do not have access to remote e-voting facility may send duly signed and completed Ballot Form (sent alongwith Annual Report) so as to reach the Scrutinizer, Mr. P. N. Parikh of Messrs Parikh Parekh & Associates, Practising Company Secretaries, duly appointed by the Board of Directors of the Company, at the Registered Office of the Company before the close of working hours **(5.00 p.m. IST)** on **Monday, 25th January, 2016**. The Ballot Forms received after the said date shall be strictly treated as if the reply from the Member has not been received.
7. The voting rights of Members shall be in proportion to their shares of the paid-up equity share capital of the Company as on the cut-off date of **Friday, 22nd January, 2016**.
8. Members can opt for only one mode of voting, i.e., remote e-voting or ballot form or voting at the AGM. In case Members cast their votes through all the modes, voting done by remote e-voting shall prevail and votes cast through ballot form or voting done at the AGM shall be treated as invalid.
9. The Annual Report 2015 containing, inter-alia, the Notice of AGM is also available for download from the Company's website www.siemens.co.in and from the NSDL's website www.evoting.nsdl.com, and also on the website of the Stock Exchanges at www.bseindia.com and www.nseindia.com.
10. For voting instructions, electronically or otherwise, Members may go through the Notes mentioned under the Notice of the 58th AGM (Page nos. 10 to 12 of Annual Report 2015). In case of any queries / grievances connected with remote e-voting, Members may refer the Frequently Asked Questions (FAQs) for Members and e-Voting User Manual for Members available at the "Downloads" section of www.evoting.nsdl.com or may also contact NSDL at the following toll free no.: 1800-222-990 or contact Ms. Pallavi Mhatre, Assistant Manager, National Securities Depository Limited, Trade World, 'A' Wing, 4th Floor, Kamala Mills Compound, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai – 400013. E-mail id - evoting@nsdl.co.in / pallavid@nsdl.co.in Tel. No. 022-24994545.

Pursuant to provisions of Section 91 of the Act and Regulation 42 of the Listing Regulations, the Register of Members and Share Transfer Books of the Company shall remain closed from **Saturday, 23rd January, 2016 to Friday, 29th January, 2016 (both days inclusive)** for the purpose of determining the entitlement of dividend declared, if any, for the year ended 30th September, 2015. The Dividend, as recommended by the Board of Directors, if declared at the 58th AGM, will be paid on **Friday, 5th February, 2016**, to those Members who hold shares in physical form and whose name appears on the Company's Register of Members as holders of Equity Shares on Friday, 29th January, 2016 and in respect of shares held in electronic form, to the Beneficial Owners of the shares as at the close of business hours on Friday, 22nd January, 2016, as per details to be furnished by NSDL and Central Depository Services (India) Limited.

**By order of the Board of Directors**
**For Siemens Limited**
Sd/-
**Ketan Thaker**
**Company Secretary**

Place: Mumbai
Date : 5th January, 2016

**Siemens Limited**
**CIN:** L28920MH1957PLC010839
**Regd. Office:** 130, Pandurang Budhkar Marg, Worli, Mumbai - 400018.
**Tel.:** +91 22 3967 7000 | **Fax:** +91 22 3967 7500
**Contact / E-mail:** Corporate-Secretariat.in@siemens.com / www.siemens.co.in/contact
**Website:** www.siemens.co.in

Business Standard
MUMBAI | WEDNESDAY, 6 JANUARY 2016

SIEMENS

# ५८वी वार्षिक सर्वसाधारण सभा, बुक क्लोजर दिनांक आणि दूरस्थ ई-मतदानविषयक माहिती याबाबतची सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सीमेन्स लिमिटेडची ("कंपनी") ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") **शुक्रवार २९ जानेवारी २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह, वाय. बी. चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१ येथे, एजीएम निमंत्रित करण्यासाठीच्या २७ नोव्हेंबर २०१५ च्या सूचनेत निश्चित केलेल्या कामकाजासाठी आयोजित करण्यात येत आहे.

ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स्)कडे नोंदणीकृत आहेत अशा सर्व सदस्यांना वार्षिक अहवाल २०१५ ची इलेक्ट्रॉनिक प्रत आणि इतर सर्व सदस्यांना कागदी प्रत त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर अनुज्ञेय पद्धतीने पाठविण्यात आली आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") कलम १०८, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) दुरुस्ती नियम २०१५ ("नियम") द्वारे दुरुस्त केलेल्या कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ च्या नियम २० समवेत आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ ("लिस्टिंग रेग्युलेशन्स") च्या रेग्युलेशन ४४ समवेत वाचून त्या अन्वये कंपनी आपल्या सदस्यांना, ५८ व्या एजीएमसाठीच्या सूचनेमध्ये दिलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मत नॅशनल सिक्युरिटीज् डिपॉझिटरी लिमिटेडने ("एनएसडीएल") पुरविलेल्या दूरस्थ ई-मतदान सेवेद्वारे आणि ज्या सदस्यांना ई-मतदान सुविधा वापरता येणे शक्य नसेल त्यांच्यासाठी एका मतपत्रिकेद्वारे देता येण्याची सुविधा पुरवीत आहे आणि कामकाज अशा मतदानाद्वारे पार पाडले जाऊ शकेल. ह्या अधिनियमाच्या आणि नियमांच्या तरतुदींनुसार तपशील खाली दिलेला आहे :

१. २८ डिसेंबर २०१५ रोजी कंपनीने २०१५ च्या वार्षिक अहवालासोबत एजीएम सूचना आणि इतर कागदपत्रे, ज्यांची नावे सदस्यांच्या खातेबुकात/ डिपॉझिटरीच्या नोंदींमध्ये ११ डिसेंबर २०१५ रोजी आलेली आहेत अशा सदस्यांना ई-मेलने किंवा कागदी प्रतीच्या स्वरूपात पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

२. दूरस्थ ई-मतदानाचा कालावधी **मंगळवार, २६ जानेवारी २०१६ रोजी (सकाळी ९.०० वा. भारतीय प्रमाणवेळेनुसार)** सुरू होईल आणि **गुरुवार, २८ जानेवारी २०१६ रोजी (सायंकाळी ५.०० वा. भारतीय प्रमाणवेळेनुसार)** संपेल. दूरस्थ ई-मतदानाचे मॉड्यूल एनएसडीलकडून **गुरुवार दि. २८ जानेवारी २०१६ रोजी सायं.५.०० नंतर (भारतीय प्रमाण वेळेनुसार)** बंद करण्यात येईल आणि सदर वेळ उलटल्यानंतर दूरस्थ ई-मतदानास परवानगी मिळणार नाही.

३. सूचनेच्या प्रेषणानंतर कंपनीचे शेअर्स संपादित करून कंपनीची सदस्य होणारी आणि **शुक्रवार २२ जानेवारी २०१६** ह्या अंतिम दिनांकाला शेअर्स धारण करणारी कोणीही व्यक्ती evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून लॉगइन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकेल.

   तथापि जर एखादा सदस्य एनएसडीलकडे दूरस्थ ई-मतदानासाठी आधीच नोंदणीकृत असेल तर तो सदस्य त्याचा विद्यमान यूजर आयडी आणि पासवर्ड मत देण्यासाठी वापरू शकेल. जर एखादा सदस्य पासवर्ड विसरला असेल तर www.evoting.nsdl.com वर उपलब्ध असलेला "फरगॉट यूजर डिटेल्स/पासवर्ड" हा पर्याय वापरून त्याचा पासवर्ड पुनस्थापित करू शकेल किंवा १८००-२२२-९९० ह्या नि:शुल्क क्रमांकांवर एनएसडीएलशी संपर्क साधू शकेल.

   ज्या व्यक्तीचे नाव अंतिम अनुज्ञेय दिनांकापर्यंत म्हणजे कट ऑफ दिनांकापर्यंत सदस्यांच्या खातेवहीत किंवा डिपॉझिटरीजनी राखलेल्या लाभार्थी मालकांच्या खातेवहीत नोंदविलेले असेल फक्त त्यालाच दूरस्थ ई-मतदानाचा, मतपत्रिकेद्वारे तसेच एजीएममध्ये मतदान करण्याचा हक्क असेल.

४. एजीएम मध्ये मतदान : ज्या सदस्यांनी दूरस्थ मतदानाद्वारे किंवा मतपत्रिकेद्वारे मतदान केलेले नसेल ते त्यांचा मतदानाचा हक्क एजीएममध्ये बजावू शकतात. एजीएमच्या ठिकाणी कंपनी त्याबाबत आवश्यक व्यवस्था करील.

५. सदस्य त्यांचा मतदानाचा हक्क दूरस्थ ई-मतदानाद्वारे किंवा मतपत्रिकेद्वारे बजावल्यानंतरही सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होऊ शकतात पण त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.

६. ज्यांना दूरस्थ ई-मतदानाची सुविधा अभिगत नाही ते सदस्य, रीतसर सही केलेली आणि पूर्ण केलेली मतपत्रिका (वार्षिक अहवालासोबत पाठविलेली) कंपनीच्या संचालक मंडळाने रीतसर नियुक्त केलेले परिनिरीक्षक, मे. पारिख पारेख अँड असोसिएट्सचे कार्यरत कंपनी सचिव श्री. पी. एन. पारिख ह्यांना कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात **सोमवार २५ जानेवारी २०१६** रोजी कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी **(सायं. ५.०० वा. भारतीय प्रमाणवेळेनुसार)** मिळेल अशा रीतीने पाठवू शकतात. उक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या मतपत्रिका, संबंधित सदस्यांकडून उत्तर आले नाही असे समजून काटेकोरपणे निकालात काढल्या जातील.

७. **शुक्रवार २२ जानेवारी २०१६** ह्या अंतिम अनुज्ञेय दिनांकाला कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलाचे जितके भाग सदस्यांकडे असतील त्या प्रमाणात त्यांना मतदानाचे हक्क असतील.

८. सदस्य फक्त एकाच मतदान पद्धतीचा पर्याय स्वीकारू शकतात, म्हणजे, दूरस्थ ई-मतदान किंवा मतपत्रिका किंवा एजीएममध्ये मतदान. जर सदस्यांनी सर्व पद्धतींनी मतदान केले तर दूरस्थ ई-मतदानाने केलेले मतदान ग्राह्य धरले जाईल आणि मतपत्रिकेद्वारे आणि एजीएममध्ये केलेले मतदान अवैध समजण्यात येईल.

९. एजीएमच्या सूचनेसह वार्षिक अहवाल २०१५ कंपनीच्या www.siemens.co.in ह्या वेबसाईटवर आणि एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com ह्या वेबसाईटवर तसेच स्टॉक एक्स्चेंजिस्च्या www.bseindia.com ह्या आणि www.nseindia.com ह्या वेबसाईट्सवर डाऊनलोड करता येण्यासाठी उपलब्ध आहे.

१०. इलेक्ट्रॉनिक किंवा अन्य पद्धतीने करावयाच्या मतदानासंबंधी सूचनांसाठी सदस्य ५८व्या एजीएमच्या सूचनेखाली नमूद टिपणे पाहू शकतात (वार्षिक अहवाल २०१५ पृ.क्र.१० ते १२). दूरस्थ ई-मतदानासंबंधी काही प्रश्न किंवा तक्रारी असतील तर सदस्य, www.evoting.nsdl.com वरील 'डाऊनलोड' विभागात त्यांच्यासाठी असलेले नेहमी विचारले जाणारे प्रश्न(एफएक्यूज्) आणि मॅन्युअल्स फॉर मेंबर्स पाहू शकतात किंवा एनएसडीएलशी पुढील नि:शुल्क क्रमांवरही संपर्क साधू शकतात : १८००-२२२-९९० किंवा मिस्. पल्लवी म्हात्रे, सहा प्रबंधक, नॅशनल सिक्युरिटीज् डिपॉझिटरी लिमिटेड, ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४था मजला, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई -४०००१३ ह्यांच्याशी संपर्क साधू शकतात. ई-मेल पत्ता - evoting@nsdl.co.in / pallavid@nsdl.co.in. दूरध्वनी क्र. ०२२-२४९९४५४५

अधिनियमाचे कलम ९१ आणि लिस्टिंग रेग्युलेशन्सचे रेग्युलेशन ४२ च्या तरतुदींनुसार कंपनीच्या सदस्यांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण वही **शनिवार २३ जानेवारी २०१६ ते शुक्रवार २९ जानेवारी २०१६ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट)** ३० सप्टेंबर २०१५ रोजी संपलेल्या वर्षासाठी, असल्यास, घोषित लाभांशाचे हक्कदार ठरविण्याच्या उद्देशाने बंद राहील. संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार ५८व्या एजीएममध्ये लाभांश घोषित झाल्यास तो **शुक्रवार, ५ फेब्रुवारी २०१६** रोजी जे सदस्य भौतिक स्वरूपात भाग धारण करतात आणि ज्यांची नावे कंपनीच्या सदस्य नोंदवहीत समभाग धारक सदस्य म्हणून शुक्रवार २९ जानेवारी २०१६ रोजी असतील त्यांना आणि इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील शेअर्सच्या बाबतीत शुक्रवार २२ जानेवारी २०१६ रोजी कामकाज बंद होण्याच्या वेळी शेअर्सचे लाभार्थी मालक म्हणून एनएसडीएलने तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ह्यांनी पुरविण्याच्या तपशिलानुसार असतील, त्यांना देण्यात येईल.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**<br>
**सीमेन्स लिमिटेड** करिता<br>
स्वाक्षरी/-<br>
**केतन ठाकर**<br>
**कंपनी सचिव**

स्थळ : मुंबई<br>
दिनांक : ५ जानेवारी २०१६

**सीमेन्स लिमिटेड**
CIN: L28920MH1957PLC010839
**नोंदणीकृत कार्यालय:** १३०, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१८.
**टेलिफोन:** +९१ २२ ३९६७ ७००० | **फॅक्स:** +९१ २२ ३९६७ ७५००
**संपर्क/ईमेल:** Corporate-Secretariat.in@siemens.com / www.siemens.co.in/contact
**वेबसाइट:** www.siemens.co.in